## Subject: Marathi (मराठी)

स्मशानातील सोनं
लेखक - अण्णाभाऊ साठे

**Production of coursework**
**Content for Undergraduate Course**

Class: B. A. Part I

Paper No. Compulsory Marathi

Module: स्मशानातील सोनं (कथा) – अण्णा भाऊ साठे

## Developed by

Dr. D. M. Dange

Assistant Professor, Department of Marathi

Karmaveer Bhaurao Patil Mahavidyalaya, Pandharpur. Dist- Solapur.

| Discription of Module | |
|---|---|
| Subject Name | Marathi |
| Paper Name | Compulsory Marathi |
| Module Name/ Title | स्मशानातील सोनं (कथा) – अण्णा भाऊ साठे |
| Module Id | Mar/Katha/2 |
| Pre-requisites | अण्णा भाऊ साठे यांच्या कथेचे आकलन |
| Objectives | • अण्णा भाऊ साठे यांच्या कथेचे वाचन<br>• कथेचे स्वरुप व रचना पाहणे<br>• कथेतील घटकांचे आकलन करुन घेणे |
| Keywords | अण्णा भाऊ साठे, स्मशानातील सोनं, साठे यांची कथा, अण्णा भाऊ साठे यांची कथा |

KBPMPANDHARPUR

**प्रास्ताविक** (Introduction) : **तुकाराम भाऊराव साठे** (१ ऑगस्ट १९२० — १८ जुलै १९६९) हे **अण्णा भाऊ साठे** म्हणून ओळखले जाणारे एक मराठी समाजसुधारक, लोककवी आणि लेखक होत. साठे एका मांग (दलित) समाजामध्ये जन्मलेले व्यक्ती होते. त्यांचे लेखन सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या कृतिशीलतेवर आधारलेले होते. साठे हे मार्क्सवादी-आंबेडकरवादी प्रवृत्तीचे होते, सुरुवातीला त्यांच्यावर साम्यवादाचा प्रभाव होता पण नंतर ते आंबेडकरवादी झाले. अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य हे परिवर्तनाला दिशा व चालना देणारं ठरलं. महाराष्ट्राच्या एकूणच जडणघडणीत आणि परिवर्तनात या साहित्याचे योगदान हे महत्त्वपूर्ण ठरलेला आहे. अजरामर अशा या साहित्याने उपेक्षितांच्या अंतरंगाचा वेध घेण्याचा प्रयत्न केला. उपजत बुद्धिवादी म्हणून त्यांच्या साहित्याचा धांडोळा घेता येतो. आजही मोठ्या संख्येने विद्यार्थी व अभ्यासक त्यांच्या या साहित्याचा संशोधनात्मक अभ्यास करताना दिसतात. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ लोकमानसात रुजविण्याचे महान आणि महत्त्वपूर्ण काम शाहीर अण्णाभाऊ साठे, शाहीर अमर शेख आणि शाहीर द. न. गव्हाणकर यांनी केले. मुंबई, मराठवाडा, विदर्भ, कोकण, पश्चिम महाराष्ट्र यांच्यासह सीमा प्रदेशातील विविध भागातील हजारो ठिकाणी शाहिरांनी आपल्या लालबावटा कलापथकाचे कार्यक्रम सादर केले. त्याच्यामुळे लोक प्रेरित झाले.

**कथेचा परिचय :** 'स्मशानातील सोनं' नावाची ही कथा खूप लोकप्रिय ठरलेली कथा आहे. या कथेचा नायक भीमा ही कष्ट करणारी व्यक्ती आहे. खाण कामगार म्हणून काम करत असलेल्या भीमाची खाण बंद होते. त्याचा रोजगार जातो. त्यामुळे भीमाच्या रोजंदारीचा प्रश्न निर्माण होतो. या कथेचा नायक असलेला भीमा स्मशानातील राखेतून सोनं शोधण्याचा नवा रोजगार शोधतो. या रोजगारामुळे कांही दिवस त्याच्या कुटुंबाच्या चरितार्थाचा प्रश्न मिटतो. मात्र एके रात्री शेजारच्या गावातील सावकार मेल्यानंतर त्याचे प्रेत उकरुन काढून त्याच्या तोंडातील सोनं काढण्याचा प्रयत्न करताना भीमाचा अपघात होतो. त्या अपघातात भीमाच्या उजव्या हाताची बोटे तुटून जातात. दुसऱ्या दिवशी खाण सुरु झाल्याचा निरोप भीमाला मिळतो. मात्र आपली बोटे तुटल्याने निराधार बनलेल्या भीमाच्या अगतिकतेची ही कथा आहे.

**कथेचा आशय :**

ही कथा भीमा या तरुणाला केंद्रस्थानी ठेवून लिहिली आहे. भीमा हा दलित तरुण आहे. आपल्या शरिरातील शक्तीच्या बळावर खाणीमध्ये दगड फोडण्याचे काम तो करतो. या कामात तो आनंदी असतो. मात्र एके दिवशी खाण बंद झाल्याचे त्याला कळते. तेंव्हा तो दु:खी होतो. नवा रोजगार शोधण्याचा तो प्रयत्न करतो. मात्र त्यास रोजगार मिळत नाही. तेंव्हा व्याकुळलेला भीमा नदीच्या काठाने जात असताना त्यास एका राखेच्या ढिगात कांही चमकल्याचे दिसते. तो पाहतो तर ते सोने असते. राखेच्या ढिगात सोने सापडू शकते. याचा त्यास नवा शोध लागतो. तेथून पुढे राखेतून सोनं शोधण्याचा त्याचा व्यवसाय बनतो.

भीमा राख शोधण्यासाठी आजूबाजूच्या गावातील स्मशानभूमी शोधत राहतो. एके दिवशी शेजारच्या गावातील सावकाराचा मृत्यू झाल्याची वार्ता भीमाला समजते. तेंव्हा त्या गावात जाऊन सोनं मिळविण्याची भीमा तयारी करतो. रात्री उशीरा तो स्मशानभूमीत जातो. थोडा पाऊस सुरु झालेला असतो. तेंव्हा सावकाराची कबर शोधणे खूप कठीण होते. तरीही एका नवीन पुरलेल्या कबरीस कोल्ही उकरत असतात. तेंव्हा त्या कोल्ह्यांना हुसकावून भीमा कबरीचा ताबा घेतो. प्रेत उकरुन काढतो. तेंव्हा गावाकडून कांही लोक स्मशानभूमीत येताना भीमाला जाणवतात. इतकावेळ दबा धरुन बसलेली कोल्हीही वेळ पाहून भीमावर हल्ला करतात. तेंव्हा

एकाचवेळी प्रेताच्या तोंडातील सोने काढणे; त्याचवेळी कोल्ह्यांना प्रतिकार करणे. या गोष्टी भीमा करत असतो. रात्रीची वेळ आणि पाऊसही पडत असतो. गावाकडून येणाऱ्या लोकांना आपण सापडू नये. या सर्व प्रकारामध्ये प्रेताच्या तोंडात लोखंडी पार घालून तेथील सोने शोधताना एक कोल्हा जवळ येतो. त्यास मारण्यासाठी प्रेताच्या तोंडात अडकवलेली लोखंडी पार उपसून काढतो. तेंव्हा प्रेताच्या तोंडात भीमाचा हात अडकतो. प्रेताने आपला हात पकडला आहे. अशी भीमाची समजूत होते. तेंव्हा हातातील लोखंडी पार कोल्ह्यावर उगारत असताना ती प्रेताच्या डोक्यावर मारली जाते. त्यामुळे भीमाची हाताची बोटे तुटून निघतात. तेंव्हा भीमा भीतिने तेथून निघून येतो. दुसऱ्या दिवशी दगडाची खाण सुरु झाल्याची वार्ता भीमाला कळते. मात्र दगडाच्या खाणीत काम करण्यासाठी भीमाकडे आता हाताची बोटे नसतात. आपल्या भुंड्या हाताकडे पाहून भीमा रडू लागतो.

ही कथा ग्रामीण भागातील श्रमिक कष्टकरी माणसाची कथा आहे. समाज जीवनात अनेकवेळा अशा स्वरुपाच्या घटना घडत राहतात. परिस्थितीशी आणि निर्सगाशी संघर्षाच्या कथा आपण ऐकत असतो. अण्णाभाऊ साठे हे परिस्थिती आणि माणूस यांच्यातील संघर्ष चित्रित करण्याचे काम करतात. म्हणून अण्णाभाऊंची कथा ही वाचनीय ठरते.

KBPMPANDHARPUR